बुधवार दिनांक १० जानेवारी १९९६ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

......

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ३३ वी बैठक बुधवार दि. १० जानेवारी १९९६ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माणभवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

१.	ॲडव्होकेट श्री मधु चव्हाण,	सभापती
२.	श्री उपमन्यू चटर्जी,	मुख्य अधिकारी
३.	श्री एम. जी. खाबडे,	उप सचिव, महाराष्ट्र शासन गृ. नि. व वि. स. विभाग, मंत्रालय. यांचे प्रतिनिधी.
~~४.~~	~~,, अरविंद~~	
४.	,, अरविंद रेळे,	सदस्य.
५.	,, विनोद खोपकर	,,
६.	,, चंद्रकांत विश्वासराव.	,,
७.	,, अमोद उसपकर,	,,
८.	,, भालचंद्र ठाकूर	,,
९.	,, दगडू सकपाळ,	,,
१०.	,, देवदास प्रभाकर साटम	,,
११.	,, प्रकाश संपत भूवड	,,
१२.	,, दिलीप गोडांबे	,,
१३.	,, गणेश तिकोने	,,
१४.	डॉ. विनोद मेहता,	,,
१५.	श्री अभय सावरकर	,,
१६.	,, अनंत पालकर	,,
१७.	प्रमुख अभियंता, म. न. पा. हयाचे प्रतिनिधी.	
१८.	उपकर संचालक व निर्धारक, महानगरपालिका	

मा. सभापती श्री मधु चव्हाण यांनी उपस्थित सन्माननीय सर्व सदस्यांचे, मुख्य अधिकारी/दु. व. पु. व अधिकारी वर्ग यांचे स्वागत करुन श्री गद्रे, नि. का. अ/दु. व. पु. हयांच्याकडे सचिव/दु. व. पु. या अतिरिक्त कार्यभार आहे. त्यांना आजच्या बैठकीच्या कामकाजास सुरवात करण्यास सांगितले.

मा. सदस्य श्री खोपकर यांनी सांगितले की, मा. सभापतींचे स्वीय सहाय्यक ।कर यांचे गेल्या महिन्यात अल्पशा आजाराने निधन झाले. तरी सभेला सुरवात करण्यापूर्वी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून त्यांना श्रध्दांजली वहाण्याचा शोक ठराव मांडला. यावर मा. सभापती यांनी त्यास संमती दर्शविली व सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून कै. श्री उतेकर यांना श्रध्दांजली वाहिली.

सभेच्या सुरवातीस मा. सभापतींनी श्री जाधव, उपमुख्य अधिकारी [सं.गा.] हे मागील बैठकीत काही वैयक्तिक कारणामुळे अनुपस्थित असल्याचे सांगून त्यांची ओळख मा. सदस्यांना करुन दिली.

तदनंतर श्री गद्रे, नि.का.अ. यांनी आजच्या बैठकीच्या कार्यसूची मा. सभापती यांच्या परवानगीने माहिती सभागृहास देण्यास सुरवात केली.

बाब क्रमांक : ३३/१.

विषय- दिनांक ८-१२-९५ रोजी झालेल्या ३२ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

दिनांक १.१२.९५ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत पृ.क्र. १ ते ७१ स्थायी करण्याकरिता सादर करण्यात आलेला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सदस्य श्री अरविंद [illegible] यांनी असे निदर्शनास आणून दिले की, मागील बैठकीत सुदर्शन या इमारतीस नांव देण्याचा प्रस्ताव पास केला. नंतर इमारतीचा नामकरण समारंभ झाल्याचे त्यांनी वर्तमानपत्रात वाचले. त्या समारंभास मंडळाच्या सदस्यांना मात्र बोलाविण्यात आले नव्हते. अशा समारंभास आमंत्रण देण्याची पध्दत आहे किंवा नाही याचा कृपया खुलासा करावा अशी विनंती मा. सभापतींना केली.

यावर मा. सभापती यांनी खुलासा करताना सांगितले की, हा नामकरण समारंभ गाळेधारकांतर्फे केला जातो. त्यामुळे त्यांचा तो खाजगी समारंभ असतो. मंडळाचे काम फक्त प्रस्ताव मंजूर करणे हे आहे. समारंभास कोणाला बोलवावयाचे हा तेथील रहिवाशांचा प्रश्न आहे. यावर मा. सदस्य श्री अरविंद रेळे यांनी अशा समारंभास मंडळाच्या सर्व सदस्यांना बोलाविणे आवश्यक आहे असे मत मांडले. यावर मा. सभापती यांनी हीसूचना कायदेशीर जरी नसली तरी नैतिकदृष्टया व्यवहार्य आहे. मा. सदस्य श्री रेळे यांनी असे मत मांडले की, निदान आमच्यावतीने मंडळाच्या सभापतींना तरी बोलवावयास पाहिजे होते. या मताशी सर्व सदस्यांनी सहमती दर्शवुन उपमुख्य अभियंता श्री शहा यांना याची नोंद घेण्याची सूचना मा. सभापती यांनी केली.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी पान क्र.४१ वरील नांवातील चुक निदर्शनास आणून देतेवेळी सांगितले की, " मा. सदस्य श्री खोपकर ऐवजी श्री उसपकर " असे पाहिजे होते. त्याचप्रमाणे पान क्र.४३ वर " यावर चर्चा करताना खोपकर" असे टंकलेखित करण्यात आले आहे. त्याऐवजी " यावर चर्चा करताना उसपकर" असे टंकलेखित करण्यात यावे. त्यास मा. सभापतींनी मान्यता देऊन त्यांची नोंद घेण्यात आली.

मा. सदस्य श्री दिलीप गोडांबे यांनी पान क्र.१९ चा उल्लेख करुन फाईल फाऊंडेशनच्या संदर्भात फाईल फाऊंडेशन म्हणजे काय व ओपन फाऊंडेशन म्हणजे काय? याबाबतचा अहवाल माहितीसह मिळेल काय अशी विचारणा केली होती. तसेच इमारतींच्या पुनर्बांधणीचे अंदाजपत्रक बनविण्याचे निकष मागितले होते त्याबाबत माहिती दिलेली दिसुन येत नाही.

यावर मा. सभापती यांनी उपमुख्य अभियंता श्री शहा यांना मा. सदस्यांचे प्रश्नाचे गांभीर्य समजावुन सांगून याबाबतचा माहितीसह अहवाल मा. सदस्यांना देण्यासाठी त्यांच्याकडे आणुन देण्यात यावा अशा सुचना दिल्या व त्यांच्या निदर्शनास आणुन दिले की, मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे हा अहवाल खरे तर त्यांनी अगोदरच द्यावयास पाहिजे होता. तसेच सर्व सदस्यांकडे मा. सभापती यांनी अहवाल प्राप्त न झाल्याने श्री शहा यांच्यावतीने दिलगीरी व्यक्त करुन अधिका-यांना बैठकीत मा. सदस्य उपस्थित करीत असलेल्या मुद्दयांची नोंद घेऊन संबंधित बाबींचा पाठपुरावा करावा व मा. सदस्यांना तसे लेखी कळविण्यात यावे अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य, श्री उसपकर यांनी पान क्र.६३ चा उल्लेख करुन माहिती दिली की, ८-अे, नबाब टँक रोड, माझगावच्या संदर्भात प्रश्न विचारुनही महिन्याभरात संबंधित अधिका-यांनी याविषयी मला काहीही माहिती दिलेली नाही असे सांगितले.

यावर माहिती देताना संबंधित अधिकारी श्री अतुल हूले, कार्यकारी अभियंता, पु. वि.[२] यांनी सांगितले की, ४-८-८-अे आणि १० या भूखंडांचे संपादन करण्यासाठी प्रस्ताव टाकलेला आहे आणि भूसंपादन अधिकारी यांच्याकडे अंतिम सुनावणीसाठी हा विषय आहे. दरम्यानच्या काळात ८ आणि १० या दोन इमारतींचे दुरुस्तीचे काम झालेले आहे आणि इमारतीच्या मालकाने इमारत दुरुस्त झाल्यामुळे संपादित करु नये असा आक्षेप घेतलेला आहे.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे मत प्रगट केले की, आम्ही विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात काय कार्यवाही झाली आहे याबाबतची माहिती आम्हाला कळविण्यात यावी. यावर मा. सभापती यांनी सांगितले की, विधी मंडळाच्या कामकाजाच्या पध्दती येथे लागू करावयास पाहिजेत. जर सदस्यांनी लेखी स्वरुपात

......४/-

अधिका-यांना प्रश्न विचारला तर अधिका-यांनी लेखी स्वरुपात त्याचे उत्तर द्यावयास पाहिजे. तसेच सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर पुढील बैठकीत द्यावयास अधिका-यांना बंधनकारक आहे. त्यासाठी सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची संबंधित अधिका-यांनी नोंद करुन घेऊन जर सदस्यांचा प्रश्न धोरणात्मक निर्णयाशी संबंधित असेल तर सदस्यांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर लेखी पाठवावयास अधिका-यांना काहीच हरकत नाही. यावर मा. सदस्य श्री खोपकर यांनी लेखी विचारणा करुनही लेखी उत्तर मिळाले नसल्याचे निदर्शनास आणून दिले. यावर त्यांच्या प्रश्नाचे उत्तर लेखी आलेले आहे अशी माहिती मा. सभापती यांनी देऊन सर्व सन्माननीय सदस्यांनी जागरुकपणे मिनिटस् वाचल्याबद्दल समाधान व्यक्त केले व कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

बाब क्रमांक : ३२.२ – अनुपालन अहवाल.

मागील बैठकीत जे निर्णय झाले त्याचे अनुपालन अहवाल पृ.क्र. ७३ ते ९३ वर सादर केलेले आहेत अशी माहिती नि.का.अ/दु.व.पु. श्री गद्रे यांनी दिली. यावर मा. सदस्य श्री अरविंद रेळे यांनी देण्यात आलेली माहिती अपुरी असून माहितीमध्ये कंत्राटदाराच्या नांवाचा उल्लेख केलेला नाही असे सांगितले. तसेच इमारतीत किती खर्च येणार आहे हीही माहिती दिलेली नाही. तरी याबाबतची संपूर्ण माहिती देण्यात यावी अशी त्यांनी मागणी केली.

मा. सभापती यांनी यावर सदस्यांच्या निदर्शनास आणले की, लहान-सहान माहिती देणे अशक्य आहे. यावर सदस्य श्री उसपकर यांनी निदान अंदाजित खर्च किती आहे एवढी जरी माहिती दिली असती तरी पुरेसे होते, असे मत मांडले. या मतास मा. सभापती यांनी सहमती दर्शवुन संबंधित अधिका-यांना त्याबाबतची कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, दिनांक-२८.११.९५ ला जी अंदाजपत्राके मंजूर करण्यात आली त्याची सद्यस्थिती काय आहे ? यावर मा. सभापती यांनी संबंधित अधिका-यांना अशा सूचना दिल्या की, इमारत दुरुस्तीचा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर त्याबाबतची कार्यपध्दती कशी असते याची माहिती सर्व सदस्यांना समजावून सांगावी. ~~या सुचनेवरुन~~ तदनुसार संबंधित अधिकारी श्री राव, उपमुख्य अभियंता यांनी माहिती दिली की, नवीन कामे मंजूर केल्यानंतर त्यास तांत्रिक मंजुरी [illegible] घेणे व नंतर टेंडर मागविणे, मागविलेल्या टेंडरसाठी १५ दिवसांची मुदत द्यावी लागते. मध्येच मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणून दिले की, टेंडरची अंतिम तारीख संपताच ताबडतोब काम सुरु करण्याबद्दल ठेकेदाराला सांगितले पाहिजे. परंतु तसे काहीही होत नाही. यावर श्री गद्रे, नि.का.अ. यांनी या बाबत योग्य ती माहिती लवकरात आकडेवारीसह देतो.

यावर मा. सभापती यांनी मा. सदस्यांना विनंती केली की, प्रशासकिय मंजूरी मिळाल्यापासून कामाला सुरवात होईपर्यंतचे टप्पे आपण कृपया समजावुन द्या.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, इमारत तांत्रिक समितीसमोर आल्यानंतर इमारत दुरुस्तीसाठी किती महिने लागणार यावर मा. सभापती यांनी संबंधित अधिका-यांना विचारुन या इमारतीस ३-४ महिने लागतील असे सांगितले. यावर मा. सदस्य श्री उसपकर यांचे समाधान न होउन हाच प्रकार गेली कित्येक वर्षे चालू आहे आणि तसाच चालू ठेवावयाचा का? अशी विचारणा केली.

यावर मा. सभापती यांनी सांगितले की, सरकार नवीन आल्यामुळे दोन महिन्यांत सगळे काम व्हावयास पाहिजे असे जर तुम्हाला वाटत असेल तर दोन महिन्यांसाठी आपल्याला तसे कायदे करुन द्यावे लागतील. परंतु सध्या तरी प्रचलित कायद्याप्रमाणे जी कार्यपध्दती आहे त्यानुसारच काम करावे लागेल हे कृपया मा. सदस्यांनी लक्षात द्यावे. याबाबत बोलताना मा. सदस्य श्री दगडु सकपाळ यांनी असे निदर्शनास आणुन दिले की, अंदाजपत्रकास मंजूरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामास किमान तीन ते चार महिने लागतात. तसेच पृ.क्र. १३ वरील मसालावाला चाळीच्या संदर्भात बोलताना मा. सदस्य श्री दगडु सकपाळ यांनी भूकर क्र. ४० संबंधी तेथील रहिवाशांचा सुभाष मैदान या नांवाखाली विरोध होता व आजही आहे व त्याबाबत आपण काय निर्णय घेऊ शकू अशी विचारणा केली. यावर मा. सभापती यांनी सांगितले की, जोपर्यंत विकास आराखडयामध्ये सरकार हा भूखंड -प्ले-ग्राऊंडसाठी आरक्षित ठेवत नाही तोपर्यंत आपण बांधाकाम थांबवू शकत नाही. तसेच आरक्षण बदलण्याचा अधिकार मंडळास नाही. हा पूर्ण शासनाचा अधिकार आहे. म्हणून त्या रहिवाशांना विश्वासात घेउन त्यांना काही अडचण होणार नाही असे त्यांना समजावुन सांगावे. या मतास सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली. व प्रदीर्घ चर्चेनंतर सदर अनुपालन अहवालास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ३३/३.

विषय- प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम १०३ [ब] अंतर्गत भाडेकरु/रहिवाशांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावातील इमारतींच्या दुरुस्तीबाबत.

वरील विषयाची बाब टिपणी पृ.क्र. ९५ ते ९७ वर सादर करण्यात आली आहे.

मा. सभापती यांनी उपरोक्त विषयावर चर्चा करताना १०३-बी खाली

ऊ इमारतीचे सर्व रहिवाशी सहकारी संस्था स्थापन करुन घर मालकी हक्काचे व्हावे म्हणून प्रस्ताव देतात. त्यानंतरच्या कार्यपध्दतीला पाच सहा वर्षे जातात आणि मधल्या काळात इमारत जर दुरुस्त करावयाची असेल तर असा नियम आहे की, जेव्हा रहिवाशी घर मालकी हक्काने मिळण्यासाठी अर्ज करतात त्या दिवसापासून त्या इमारतीची मंडळातर्फे दुरुस्ती मंडळ करीत नाही व अेक प्रकारे मंडळ आपली जबाबदारी टाळत असते. म्हणून मागील मंडळाने घेतलेला हा निर्णय चुकीचा आहे. सर्व कायदेशीर सोपस्कार पूर्ण होऊन संस्थेच्या ताब्यात भूखंड दिला जात नाही त्या मधल्या काळात ते जर रिपेअर सेस भरत असतील तर आणि इतर कायदेशीर कर भरत असतील तर दुरुस्तीची जबाबदारी मंडळाची असली पाहिजे, असे अनेक लोकांनी सांगितले आहे. त्यामुळे तसा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

या विषयाबाबत चर्चा करताना मा. सदस्य श्री विश्वास राव यांनी अशी विचारणा केली की, सहकारी संस्थेला मालकी हक्काने घरे घेण्यासाठी सहा वर्षांचा कालावधी का लागतो? या प्रश्नाचे उत्तर देताना संबंधित अधिकारी श्री हुले यांनी अशी माहिती दिली की, १९८६ मध्ये जो कायदा केलेला आहे त्यानुसार "अ" वर्गातील उपकरपात्र इमारती म्हणजे ४० वर्षांपूर्वीच्या इमारतीतील ७० टक्के गाळाधारकांनी एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन केली तर ती इमारत सुस्थितीत ठेवण्यासाठी किंवा पुनर्बांधणी करण्यासाठी प्राधिकरण संपादित करुन ती इमारत जमिनीसह त्या संस्थेला हस्तांतरित करते. हा कायदा आल्यानंतर मालकांनी त्याला न्यायालयात आव्हान दिले आणि सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे. आणि त्यावर स्थगिती असल्यामुळे कोणतीही कार्यवाही करता आलेली नाही. सदरबाबतची कार्यपध्दती व त्यास लागणारा कार्यालयीन विलंब ह्याबाबत थोडक्यात तपशील सर्व सन्माननीय सदस्यांना विदित करण्यात आला.

चर्चेच्या ओघात मा. सदस्य श्री खोपकर यांनी याबाबत आक्षेप घेऊन वरील माहिती ही चुकीची असल्याचे सांगितले व उदाहरण म्हणून भवानी शंकर रोडवरील मोमीन चाळीचे उदाहरण दिले. याबाबत माहिती देताना सांगितले की, मोमीन चाळीच्या मालकाने भाडेकरूंनाच नोटीस पाठविली आहे की, खोल्या खाली करण्यात याव्यात. यावर मंडळाने काहीही केलेले नाही.

वरील विषयाबाबत चर्चा करताना मा. सभापती यांनी असे मत प्रदर्शित केले की, सहकारी संस्थेचे काम हे पूर्णत: मंडळाच्या अधिकारात नसते. यामध्ये कलेक्टरकडे प्रकरण गेल्यानंतर प्रकरणाची छाननी वगैरे होते. मधल्या काळात मालक इमारत त्याची स्वत:चीच मालमत्ता असल्यामुळे न्यायालयात जाऊन स्थगिती आदेश आणतो. त्यामुळे विलंब होत असतो. त्याचबरोबर प्रशासनाच्या दिरंगाईबद्दलही विलंब होत असतो हे खरे आहे. मा. सभापती यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या की,

दिरंगाई न करता आपली कामे वेळेवर संपवावयास पाहिजेत, या मताशी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

ठराव क्रमांक–३३/२३९

"अ" वर्गातील उपकरपात्र इमारतीच्या म्हाडा अधिनियम १०३ [ब] अंतर्गतच्या सहकारी संस्थांच्या प्रस्तावास जोपर्यंत मालमत्ता म्हाडाकडे अभिहस्तांतर होत नाही तोपर्यंत अधिनियमातील तरतुदीनुसार अशा इमारतीच्या आवश्यक भागाची दुरुस्ती मंडळातर्फे करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक : ३३/४ अ.

अ] विषय– इमारत क्र. १०३, अ. न्यु. कात्रक बिल्डिंग यांनावाने ओळखल्या जाणा-या एस. के. बोले रोड, जी. एन. विभाग, दादर, मुंबई–२८ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित मातोश्री सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयाची बाब टिपणी पृ.क्र. ९९ ते १०९ वर सादर करण्यात आली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती यांनी सांगितले की, सदर इमारतीतील एकूण १५ भाडेकरुपैकी १४ भाडेकरुंची सदर सहकारी गृहनिर्माण संस्थेस संमती आहे तसेच संबंधित अधिका-यांनी सदर इमारतीची पहाणी केली असून संस्थेचा उद्देश समर्थनीय असल्याचा अभिप्राय दिलेला आहे. तरी सदर प्रस्ताव आजच्या बैठकीत मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते सदर प्रस्तावास मान्यता देण्याचे ठरले.

बाब क्रमांक :३३/४ – ब.

ब] विषय– इमारत क्र. १०८–१०८–बी, ११०–११०–बी, रावजी सोजपाल बिल्डिंग या नांवाने ओळखल्या जाणा–या राव बहादूर एस. के. बोले. रोड, जी. नॉर्थ, दादर मुंबई–२८ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित 'एकता सहकारी गृहनिर्माण संस्थाकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयाची बाब टिपणी पृ.क्र. ११० ते १३७ वर सादर केलेली आहे. ~~सदर विषयावर चर्चा करताना मा. सभापती यांनी असे सांगितले की, जुन्या ...~~

सदर विषयावर चर्चा करताना मा. सभापती यांनी असे सांगितले की, जुन्या इमारतीत एकूण १६३ भाडेकरु असून पैकी १३६ भाडेकरुंची सदर प्रस्तावास संमती आहे. संबंधित अधिका-यांनी सदर इमारतीची पहाणी केली असून इमारत सुस्थितीत ठेवण्याचा संस्थेचा [illegible] समर्थनीय असल्याचे मत दिले आहे. तरी सदर प्रस्ताव सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित मालमत्तेच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी भूसंपादन करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

बाब क्रमांक : ३३/४ – क.

विषय– इमारत क्र.८२, "सोम निवास" दुसरी लेन [एफ/एन विभाग] हिंदु कॉलनी, दादर, मुंबई–४०० ०१४ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित शुभंकरोती गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयाची बाब टिपणी पृ.क्र. १३७–अ व १३७–ड वर सादर करण्यात आली आहे. सदर इमारतीतील एकूण ९ भाडेकरुंपैकी ७ भाडेकरुंची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यास संमती आहे. संबंधित अधिका-यांनी सदर इमारतीची पहाणी केली असून प्रस्ताव समर्थनीय असल्याचे मत दिले आहे. याबाबत बोलताना मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणून दिले की, सदर मालमत्तेच्या घरमालकाने त्याच्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी मंडळाने इरादा पत्र प्रदान केले आहे व त्याची मुदत दि. २२/[illegible]/९६ रोजी संपत आहे. त्यामुळे सदर प्रस्तावावर पुढील कार्यवाही सदर इरादा पत्र रद्द केल्यानंतर करण्यात यावी. कारण त्यामुळे कायदेशीर बाबींची भविष्यात अडचण येणार नाही. तरी सदर अटीवर सदर प्रस्ताव[illegible] मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चे अंती मा. सभापती यांनी सुचविलेल्या मतास आधीन राहून सदर मालमत्तेचे [illegible] गृहनिर्माण संस्थेसाठी भूसंपादन करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

बाब क्रमांक [illegible] ३२/४ – ड.

विषय– इ. क्र. १९३–२१७, अे. जे. एन. बिल्डिंग या नांवाने ओळखल्या जाणा-या तिसरा कुंभारवाडा रस्ता, मुंबई–४०० ००४

– ८ –

बाब क्रमांक : ३३/४-

[5] विषय- इ.क्र. ११३-११७, अे, जे. एन. बिल्डिंग, या नांवाने ओळखल्या जाणा-या तिसरा कुंभारवाडा रस्ता, मुंबई-४०० ००४ [सी" विभाग येथील भूखंड व त्यावरील इमारत नियोजित श्री गणेश सहकारी गृहनिर्माण संस्थाकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयाची बाब टिपणी पृ.क्र. १३९ ते १५३ वर सादर करण्यात आली आहे. सदर विषयावर चर्चा करताना मा. सभापती यांनी सांगितले की, जुन्या इमारतीतील एकूण ६५ भाडेकरूंपैकी ५७ भाडेकरूंची या प्रस्तावास संमती आहे. संबंधित अधिका-यांनी सदर इमारतीची पहाणी केली असून इमारत सुस्थितीत ठेवण्याचा संस्थेचा उद्देश समर्थनीय असल्याचे मत दिले.आहे. तरी सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा सर्वानुमते विषयांकित मालमत्ता गृहनिर्माण सहकारी संस्थेसाठी भूसंपादनाच्या प्रस्तावास मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ३३/४ २७०

प्राधिकरण अधिनियम १९७६ अंतर्गत कलम १०३ [ब] नुसार खालील मालमत्तेच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता भूसंपादन करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[अ] इमारत क्र. १८३-अ. न्यु. कात्रक बिल्डिंग, एस. के. बोले रोड, जी. एन. विभाग, दादर, मुंबई-२८. नियोजित मातोश्री सहकारी गृ. नि. संस्थेकरिता संपादनाचा प्रस्ताव.

[ब] इमारत क्र. १०८-१०८-बी, ११०-११०-सी, रावजी सोजपाल बिल्डिंग, रावबहादूर एस. के. बोले रोड, जी. नॉर्थ, दादर, मुंबई-२८- नियोजित एकता सहकारी गृ. नि. संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

[क] इमारत क्र. ८२, "सोम निवास" दुसरी लेन [एफएन विभाग] हिंदु कॉलनी दादर, मुंबई-१४ - शुभंकरोती स. गृ. नि. संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

[ड] इमारत क्र. ११३-११७-अे, जे. एन. बिल्डिंग, तिसरा कुंभार वाडा रस्ता, मुंबई-४०० ००४, सी. विभाग- श्री गणेश स. गृ. नि. संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

बाब क्रमांक : ३३/५

विषय- इमारत क्र २१२ बेलासेस रोडच्या दुरुस्ती बाबत.

उपरोक्त विषयाची बाब टिपणी पृ.क्र. १५५ ते १५७ वर सादर करण्यात
आली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी
असे मत मांडले की, जुन्या अंदाजपत्रकाप्रमाणे आपण कामाला सुरवात करणार
आणि काम अर्धवट ठेऊन बंद करणार आणि पुन्हा सांगणार की, अंदाजपत्रक
सुधारित करु आणि कामाला पुन्हा सुरवात करु. यावर खुलासा करताना
उपमुख्य अभियंता श्री राव यांनी तसे होणार नाही असे स्पष्ट केले. मा. सदस्य
श्री खोपकर यांनी अशी माहिती दिली की, ते रहात असलेल्या इंडियन हाऊस
या इमारतीच्या दुरुस्तीचे काम किती कच्चे झाले आहे आणि तरीही कंत्राटदाराला
त्याचे संपूर्ण देयक मिळाले आहे. अशी माहिती देऊन त्या कंत्राटदाराचे बील
पासच कसे झाले अशी विचारणा केली. त्यानी पुढे सांगितले की, कंत्राटदाराने
या इमारतीचे काम दंगलीमुळे अर्धवट सोडले होते. बांबूही अजून इमारतीच्या
गच्चीत पडून आहेत. यावर मा. सभापती यांनी श्री राव, उपमुख्य अभियंता यांना
सदस्यांच्या म्हणण्याचा अर्थ सांगताना असा खुलासा केला की, ९० साली ज्या
कामाचा अंदाजे खर्च रु. १० लाख होता. ते काम ५ वर्षांनी १० लाखात होईल का?
याबाबत ~~त्यांना लेखी उत्तर देण्यात यावे अशी मागणी केली. त्याप्रमाणे~~
मा. सदस्यांना लेखी उत्तर देण्यात यावे अशा सूचना मा. सभापती यांनी दिल्या.
मा. सदस्य श्री विश्वास राव यांनी असे निदर्शनास आणून दिले की, वरील
इमारत खुपच जुनी असुन ~~१९२० सालची इमारत आहे~~. त्या इमारतीची परिस्थिती अतिशय खालावली
आहे. यावर उपमुख्य अभियंता श्री राव त्या इमारतीची तपासणी करुन उपलब्ध
निधीत जेवढे काम करणे शक्य होईल तेवढे करावयाचे आहे. मुळातच काम ५ वर्षे
रखडलेले असल्याने आता पुन्हा अंदाजपत्रकाकरिता २/३ महिने घालविणे योग्य
नाही. म्हणून उपलब्ध निधीत प्रशासकिय मान्यता देऊन सुधारित अंदाजपत्रका-
साठी प्रस्ताव पुन्हा मंडळाकडे सादर करावा लागेल. या मतास सर्वांनी सहमती
दर्शवुन विषयांकित प्रस्तावास मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ३३/२७९

इमारत क्र. २१२, बेलासेस रोडच्या दुरुस्तीबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते
मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक : ३३/६

विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतीच्या दुरुस्ती कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतीच्या दुरुस्ती कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना मंजूरी देण्याचे प्रस्ताव पृ.क्र. १५९ ते २८५ वर सादर करण्यात आले आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापतींनी अशी माहिती दिली की, इमारतींची कामे चालू असून त्यांची सुधारीत अंदाजपत्रके आपल्यासमोर मंजूरीसाठी ठेवली आहेत. यावर मा. सदस्य श्री विश्वास राव यांनी अशी विचारणा केली की, ज्या इमारतींची कामे सुरु आहेत त्या इमारतींना सदस्यांना भेट द्यावयास मिळेल काय? अशी भेट पुढील बैठकीपूर्वी देण्याची इच्छा सदस्यांनी व्यक्त केली असता मा. सभापती यांनी त्यास मंजूरी दिली. सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळाच्या सुधारित अंदाजपत्रकांना मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ३३/ 282

दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतीच्या दुरुस्तीच्या परिशिष्ट "अ" मधील सुधारित अंदाजपत्रकांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक : ३३/७

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्ती कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

उत्तर परिमंडळातील इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्याचे प्रस्ताव पृ.क्र. २८७ ते ३२७ वर सादर करण्यात आले आहेत. सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती यांनी सर्व सन्माननीय सदस्यांच्या असे निदर्शनास आणून दिले की, आता आचारसंहिता कधीही लागू होईल. त्या काळात २/४ इमारती जर पडल्या व काही अपघात झाला तर युतीच्या सरकारवर त्याचा ठपका यावयास नको. म्हणून काही इमारतींचे सुधारित अंदाजपत्रके तयार केली आहेत व ती आपल्या सर्वांच्या माहितीसाठी व मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील सर्व सुधारित अंदाजपत्रकांना सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ३३/ २८२

उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतीच्या दुरुस्तीच्या सुधारित परिशिष्ट "ब" मधील अंदाजपत्रकांना सर्वानुमते ~~मंजूरी देण्याचे ठरले~~ मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक : ३३/८

विषय- अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी घ्यावयाचे विषय.

उपरोक्त विषयांतर्गत मा. सभापतींच्या परवानगीने उत्तर व दक्षिण परिमंडळातील दुरुस्ती कामाच्या २०३ +३ = २०६ अंदाज पत्रकांना प्रशासकिय मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव सर्व सन्माननीय सदस्यांना ~~प्रस्ताव~~ सादर करण्यात आले आहेत. यावर चर्चा करताना मा. सभापती यांनी सांगितले की, अंदाजपत्रके प्रशासकिय मंजूरीसाठी आपल्यासमोर सादर करण्यात आली आहेत. त्यांनी पुढे असे प्रतिपादन केले की, आतापर्यंत दुरुस्ती कामाची अंदाजपत्रके ही सन-१९९० सालच्या डिस्ट्रीक्ट शेडयुल्ड ऑफ रेटच्या आधारे करण्यात आली होती. मंडळाच्या अधिका-यांना अशा सूचना दिल्या आहेत की, ते जे ~~सिव्हिलाईज्ड एस्टिमेट~~ कृत्रिम अंदाजपत्र बनवितात ते आम्हाला चालणार नाही. पी. डब्ल्यू. डी. च्या डिपार्टमेंटने जे रेट तयार केले आहेत ते ऑफिशियल आहेत. त्या ~~रेटवर~~ दरावर आधारित प्रस्ताव तयार करण्यात यावेत. त्या प्रस्तावांना मंजूरी दिल्यानंतर अधिका-यांनी मुख्य अभियंता यांच्याकडे बसावयाचे व काही कामांचे दर कमी होऊ शकतील ते प्रत्यक्ष कमी करुन तांत्रिक समितीसमोर जाण्यापूर्वी ~~दर कमी करुन जे~~ नवीन दराप्रमाणे अंदाजपत्रके तयार ~~करण्यात येईल~~ करुन ती मंडळाच्या बैठकीत सदस्यांच्या माहितीसाठी सादर करण्यात यावीत. ~~ठेवावयाचे आणि मंडळाच्या बैठकीत ठेवल्याशिवाय काम सुरु करावयाचे नाही.~~

सविस्तर चर्चेअंती दक्षिण व उत्तर परिमंडळातील इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या एकूण २०६ अंदाजपत्रकावर खालील अटींच्या आधिन राहून मंजूरी देण्याचे ठरले.

१. या अंदाजपत्रकात वापरलेले नवीन दरपत्रक [१९९५-९६] मुख्य अभियंता, यांनी तपासणी करन प्रत्येक बाबीच्या तपशीलाची खातरजमा करुन प्रत्येक दरास मंजूरी द्यावी.

२. तपासलेल्या दराप्रमाणे आता सादर केलेली अंदाजपत्राकाचे आकडेमोडीमध्ये, सुधारणा करण्यात यावी व त्यानुसार अंदाजपत्रकांची किंमत तयार करावी.

३. या आकडेमोडीप्रमाणे आलेल्या अंदाजपत्राकाचे किंमतीस मान्यता देण्यात येत आहे यापेक्षा किंमत वाढल्यास सुधारित किंमतीस मंडळाची मान्यता घ्यावी लागेल.

४. या सर्व अंदाजपत्रकांची तपासलेल्या व सुधारलेल्या दरसूची प्रमाणे येणारी एकूण किंमतीचा तपशील मंडळासमोर पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.

५. क्र. २ प्रमाणे अंदाजपत्राके तयार झाल्यावर त्यास तांत्रिक मान्यता देऊन नंतरच प्रत्यक्ष कामास सुरवात करण्यात यावी.

ठराव क्रमांक : ३३/२०??

दक्षिण व उत्तर परिमंडळातील इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या एकूण २०६ अंदाजपत्रकांना खालील अटींच्या आधीन राहून प्रशासकिय मान्यता देण्यात आली.

१. या अंदाजपत्रकात वापरलेले नवीन दरपत्रक [१९९५-९६] मुख्य अभियंता/प्रा. यांनी तपासणी करुन प्रत्येक यादीच्या तपशीलाची खातरजमा करुन प्रत्येक दरास मंजूरी घ्यावी.

२. तपासलेल्या दराप्रमाणे आता सादर केलेली अंदाजपत्राकाचे आकडेमोडीमध्ये सुधारणा करण्यात यावी व त्यानुसार अंदाजपत्राकांची किंमत तयार करावी.

३. या आकडे मोडीप्रमाणे आलेल्या अंदाजपत्राकाचे किंमतीस मान्यता देण्यात येत आहे यापेक्षा किंमत वाढल्यास सुधारित किंमतीस मंडळाची मान्यता घ्यावी लागेल.

४. या सर्व अंदाजपत्राकांची तपासलेल्या व सुधारलेल्या दरसूचीप्रमाणे येणारी एकूण ~~रक्कम~~ किंमतीचा तपशील मंडळासमोर पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.

५. क्रमांक-२ प्रमाणे अंदाजपत्राके तयार झाल्यावर त्यास तांत्रिक मान्यता देऊन नंतरच प्रत्यक्ष कामास सुरवात करण्यात यावी.

मा. सभापती यांनी सर्व सदस्यांना सांगितले की, आचारसंहिता ~~सध्या~~ लागू झाली नाही तर 30 जानेवारी ९६ रोजी बजेटची बैठक ठेवली आहे. पुढील वर्षाच्या बजेटच्या माहितीच्या प्रती मा. सदस्यांना आपण देऊ शकू काय? अशी विचारणा नि. का. अ. यांना केली असता त्याप्रमाणे देऊ शकू असे नि. का. अ. यांनी सांगितले. [illegible] सांगितले की ~~तसेच~~ जनहितासाठी म्हणून लोकांची कामे थांबू नयेत म्हणून आचारसंहिता केव्हाही लागू होण्याची शक्यता लक्षात घेऊन एखादी जादा बैठक आपल्याला घ्यावी लागेल, ~~असे मा. सभापती यांनी मत मांडले.~~ यास सर्व सदस्यांनी अनुमती दर्शविली. ~~या मताशी सर्व सदस्यांनी अनुमती दर्शविली.~~

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. देवदास साटम यांनी असे लक्षात आणून दिले की, अनुपालन अहवालातील पृ. क्र. १ वर ८ क्रमांकावर वाडावाला इमारत, डी. पी. वाडीसमोर शेरा लिहिलेला आहे की, काम जवळजवळ पूर्ण झालेले आहे. हे खरे नसून त्या इमारतीच्या रहिवाशांची तक्रार आहे की, जे काही काम झालेले आहे ते व्यवस्थित झालेले नसून काही दुरुस्ती करावयाचे राहिली आहे. मा. सदस्यांच्या या मताशी मा. सभापतींनी सहमती दर्शवून अधिका-यांनी चुकीचा रिपोर्ट सादर केल्याचे मत मांडले व माहिती देताना सांगितले की, कंत्राटदाराने इमारतीचे काम थांबविलेले असून त्या कंत्राटदाराचे नांव राधेशाम मिश्रा असे आहे. त्याला आपण रु. 3 लाख दिलेले आहेत. त्या इमारतीच्या रहिवाशांच्या तक्रारीही येत आहेत.

यावर संबंधित अधिकारी श्री. महाजन यांनी माहिती देताना सांगितले की, त्यामध्ये एकूण ५ इमारती आहेत. त्यांना देण्यांत आलेल्या एन. ओ. सी. मध्ये घरमालक काम करू देत नाही. ठेकेदार काम करीत असूनही त्याला पैसे देत नाहीत. तो ठेकेदार मंडळाकडे येऊन पैसे मागतो. दुस-या एका इमारतीचे काम जवळजवळ ९० टक्के पूर्ण झालेले आहे अशी माहिती दिली. मा. सदस्य श्री. देवदास साटम यांनी सांगितले की, जे काम झालेले आहे ते [illegible] आहे, असे रहिवाशांचे म्हणणे आहे. यावर मा. सभापती यांनी रहिवाशांची ही तक्रार खरी असल्याचे सांगून संबंधित अधिका-यांनी चुकीचा रिपोर्ट दिल्याचे मत मांडले. यावर संबंधित अधिका-यांनी तपासणी करून पुढील बैठकीत माहिती सादर करू असे आश्वासन दिले. यास मा. सभापती यांनी मान्यता दिली.

पूर्तता
का. अ. "ई" १ वि.

वरील चर्चेनंतर मा. सदस्य श्री. उसपकर यांनी अशी सूचना मांडली की, प्रत्येक विभागाच्या मंडळाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या दालनांत कामांची प्रगती म्हणजेच काम केव्हा सुरु झाले, केव्हा संपणार, ई. दर्शविणारा तक्ता लावण्यांत यावा. ह्यास सर्व सदस्यांनी मंजूरी दिली. तसेच मा. सभापतींनी त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे संबंधित सर्व कार्यकारी अभियंता, दुरुस्ती विभाग यांना आदेश दिले.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी त्यांच्या विभागातील एका दुरुस्ती कामाबाबत बोलताना सांगितले की, भाडेकरुंच्या असहकार्यामुळे एखादे काम बंद असेल तर त्याची माहिती त्या विभागाच्या सदस्यांना देण्यांत यावी. जेणे करुन त्यावर काही मार्ग काढता येईल. ह्या विषयाबाबत बोलताना मा. सभापती यांनी असे मत प्रदर्शित केले की, आपापल्या विभागातील प्रत्येक मा. सदस्याने अशा इमारतींस भेट द्यावी व भाडेकरुंच्या असहकारामुळे काम होत नसल्याचे निदर्शनास आल्यास भाडेकरुंची काय समस्या आहे याबाबत माहिती काढावी. म्हणजे मंडळाच्या अधिकाऱ्यांनी काही चुकीचा रिपोर्ट दिला आहे की, खरोखरच रहिवाशांची काही अडचण आहे हे समजेल. मा. सभापती यांनी मंडळाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या की, भाडेकरुंच्या असहकारामुळे जर काम लांबणीवर पडत असेल तर मा. सभापती यांना त्यांची कल्पना द्यावी. या मताशी सर्व सन्मा. सदस्यांनी सहमती दर्शविली.

मा. सदस्य श्री. अरविंद रेळे यांनी असे निदर्शनास आणून दिले की, मागील बैठकीत महानगरपालिकेच्या अंशदाना संदर्भात जी रक्कम गोळा झाली आहे त्याची माहिती देणार होता. यावर मा. सभापती यांनी मु. ले. अ., श्री. मालवणकर यांना माहिती देण्याची सूचना दिली. त्याप्रमाणे श्री. मालवणकर यांनी माहिती सर्व उपस्थितांना वाचून दाखविली.

महानगरपालिकेच्या अधिका-याने दिलेल्या माहितीनंतर मा.सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, रुपये २४ कोटींचे एक्झिमशनची जी प्रकरणे सरकारकडे पडून आहेत. आणि सरकार मालकांना २४ कोटींचे एक्झीम्पशन देत असेल तर आम्ही मंडळ कसे चालवावयाचे असा प्रश्न उपस्थित केला. एकतर सरकारने कोठल्याही मालकाला एक्झिमशन देता कामा नये असे सरकारला आपण सांगावे. मालक एक्झीम्शन घेऊन जातील आणि सरकार मंडळाला पैसेही देणार नाही आणि त्यामुळे मुंबई बेटावरील इमारतींची दुरुस्ती होणार नाही.

मा.सभापती यांनी महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी श्री.खाबाडे यांचेकडे अशी विचारणा केली की, मंडळाचे पुनर्रचनेचे जे प्रस्ताव सरकारकडे सादर केले जातात ते लवकर मंजूर होत नाहीत. असे किती प्रस्ताव प्रलंबित आहेत. यावर संबंधित अधिका-यांनी याबाबतची माहिती त्यांचेकडे आता उपलब्ध नसल्याचे सांगितले. यावर मा.सभापतींनी पुढील बैठकीस संबंधित माहिती घेवून येण्याची सूचना दिली.

मा.सभापती यांनी महानगरपालिकेकडे किती प्रस्ताव सादर केले आहेत व किती शिल्लक आहेत. याबाबतची विचारणा केली, यावर महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता यांनी सविस्तर माहिती देवून उपस्थितींच्या असे निदर्शनास आणून दिले की, प्रत्येक महिन्याच्या तिस-या शुक्रवारी मंडळाचे अधिकारी व महानगरपालिकेचे अधिकारी यांची एक संयुक्त बैठक घेण्यात येते.

मा.सदस्य श्री.भालचंद्र ठाकूर यांनी असे निदर्शनास आणून दिले की, यूतीच्या सरकारने निवडणुकीच्याआधी एक वचननामा दिला होता. त्यात एक वचन दिले होते की, युतीचे सरकार आल्यानंतर सर्व संक्रमण शिबिरांची आम्ही युध्दपातळीवर सुधारणा करणार आहोत. त्याबाबत काय प्रगती झाली आहे ? अशी विचारणा केली.

यावर मा.सभापती यांनी ~~अधिकारी~~ श्री.राव यांना माहिती देण्यास सांगितले यावर बोलताना श्री.राव यांनी सांगितले की, मागील बैठकीत ~~आपण प्रस्ताव सादर केला होता की,~~ संक्रमण शिबीरात पाणीपुरवठा, ड्रेनेज सुधारणा इत्यादीसाठी रु.१ कोटी ८६ लाख ~~अंदाजपत्रक~~ मंजूर झालेले आहेत आता नकाशे व अंदाजपत्रके तयार करण्याचे काम चालू आहे. मे-९६ पर्यन्त बहुतांशी काम पूर्ण करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. तसेच जेथे अतिक्रमण होते, किंवा समाजकंटकांचा त्रास होतो. अशा ठिकाणी कंपाउंड वॉल टाकण्याचा प्रस्ताव मागील बैठकीत पास झालेला आहे. त्याचेही नकाशे व अंदाजपत्रके तयार करण्यात येत आहे. ते पास करुन पुढील कार्यवाही एक महिन्याच्या आत सुरु होईल असे आश्वासन दिले.

मा. सभापती यांनी असे अवगत करुन दिले की, त्यांनी दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सभापतींचा कार्यभार हाती घेतल्यावर ~~मा. गृहनिर्माण मंत्री यांच्या सल्लामसलतीने~~ दुरुस्ती कामासाठी रु. १० कोटी वेगळे देण्यात यावेत, तसेच दरवर्षाच्या पुनर्रचना व अन्य कामांसाठी १०-१२ कोटी रुपयांऐवजी २५ कोटी रुपये द्यावे अशी मागणी केली होती. ही मागणी शासनाने तत्वत: मंजूर करुन १० कोटी रुपये द्यावयाचे मान्य केले आहे. त्यांनी पुढे असे ही सांगितले की, संबंधित अधिकारी वर्गानिही मोलाचे सहकार्य केलेले आहे.

मा. सदस्य विश्वासराव यांनी असे सांगितले की, त्यांनी मा. मंत्री महोदयांच्या समवेत सायन संक्रमण शिबीराच्या कार्यालयाला भेट दिली असता, संबंधित अधिका-यांनी जो अहवाल दिलेला आहे की, फक्त ४० खोल्या रिकाम्या आहेत तो अतिशय थातुर-मातुर आहे. तरी याबाबत सविस्तर माहिती मा. सदस्यांना देण्यात यावी.

यावर उपमुख्य अधिकारी [सं.गा.] श्री. जाधव यांनी माहिती देतांना सांगितले की, सायन संक्रमण शिबीरामध्ये कार्यालयीन रेकॉर्डप्रमाणे २ लोक घुसखोर आहेत, यावर मा. सभापती यांनी सांगितले की, मा. सदस्य यांनी त्यांना ४७ घुसखोरांची यादी दिली आहे. तरी ही अतिशय गंभीर गोष्ट आहे असे मत मांडले.

मा. सदस्य श्री. विश्वासराव यांनी अशी विचारणा केली की, त्यांना अशी माहिती द्यावी की, संक्रमण शिबीरे कोठे कोठे आहेत व एकूण किती गाळे आहेत. यावर मा. सभापती यांनी संबंधित अधिका-यांनी सदस्यांना पाहिजे असलेली माहिती लेखी स्वरुपात द्यावी अशा सूचना दिल्या.

उपमुख्य अधिकारी [सं.गा.] श्री. जाधव यांनी माहिती देतांना सांगितले की, एकूण ४६ संक्रमण शिबीरे असून त्यामध्ये एकूण २०,९६१ गाळे आहेत. त्यामध्ये १८८५ आजमितीस घुसखोर आहेत. या १८८५ घुसखोरांपैकी गेल्या महिन्यात जवळ - जवळ ४२ घुसखोर काढून टाकले.

यावर मा. सभापती यांनी एकूण घुसखोर किती आहेत त्याची माहिती दिली ती खालील प्रमाणे.

१]	कुलाबा	२
२]	मानखुर्द/सायन/पंतनगर	३
३]	रमाबाई नगर	९७
४]	कन्नमवार नगर	१२
५]	गोरेगांव [पूर्व]	२३५

६]	गोरेगांव	२३६
७]	गोरेगांव	३७५
८]	दहिसर	१७८
९]	वांद्रे/बोरिवली[पूर्व]/ मालवणी	३०४

यावर मा. सदस्य श्री. दगडू सकपाळ यांनी सूचवली मुख्य अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली मंडळाच्या अधिका-यांची एक कमिटी नेमावी. ज्यामुळे कायदेशीर अडचणींच्या बाबतीत योग्य ते मार्गदर्शन होईल.

यावर मा. सभापती यांनी या विषयाबाबत सर्व सदस्यांच्या भावना अतिशय तीव्र असल्याचे निदर्शनास आणून मुख्य अधिकारी यांना विनंती केली की, ज्या प्रकरणी न्यायालयाने किंवा सक्षम अधिका-याने स्थगिती दिलेली आहे ती सोडून इतर घुसखोरांनी काढण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी व मा. सदस्यांच्या याबाबतच्या भावना लक्षात घेऊन पुढील बैठकीत मंडळाने काय प्रगती केली आणि काय करण्यात येणार आहे याबाबत मुख्य अधिकारी व सहमुख्य अधिकारी यांनी सर्व सदस्यांना माहिती देण्याची यावी विनंती केली.

मा. सभापतींनी, श्री. झेंडे यांना सुरक्षा रक्षकाबाबत मागील बैठकीत सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत थोडक्यात माहिती देण्यास सांगितले. यावर सहमुख्य अधिकारी श्री. झेंडे यांनी सुरक्षा रक्षकांच्या बाबतीत माहिती देतांना सांगितले की, मागे सन्माननीय सदस्यांनी वसाहतीस भेट दिली असता खाजगी संस्थेच्या सुरक्षा रक्षकांचे काम अतिशय खराब आहे असे दिसून आले. मा. सभापती यांच्यासमोर त्यांच्या बाबत दोन बैठका घेऊन सदर सुरक्षा रक्षकांची एजन्सी आपण बंद केली आहे. सध्या महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीतील लेबर डिपार्टमेंटच्या अंडर काम करणारे सेक्युरिटी बोर्ड आहे. त्यांच्या सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांची नेमणूक ६ महिने प्रायोगिक तत्वावर केलेली आहे. शिवाय आपणास विनंती आहे की, आपल्या माहितीत शासकिय, निमशासकिय वा खाजगी अशी सुरक्षा रक्षकांची संस्था असेल तर सांगावे. त्यांनाही आपण काम करण्यास देऊ.

याबाबत बोलतांना मा. सदस्य श्री. प्रकाश भूवड यांनी असे मत दर्शविले की, अनधिकृत भाडेकरुंचे दोन प्रकार करता येतील. जे लोक त्यांची इमारत दुरुस्ती/पुनर्बांधणी होऊनही संक्रमण शिबिरातील गाळा सोडत नाहीत पण

नवीन इमारतीतील गाळ्यांचा ताबा घेऊन ते स्वतः रहातात आणि संक्रमण शिबिर गाळा भाड्याने दुसऱ्यास देतात. अशी अनेक प्रकरणे कुलाबा संक्रमण शिबिरामध्ये बरीच आहेत. तरी आपण त्यांच्यावर काय कारवाई करणार? अशी विचारणा केली.

यावर मा.सभापती यांनी सदस्यांना उद्देशून सांगितले की, पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांचा ताबा घेऊन संक्रमणशिबिरातील गाळ्याचा ताबा न सोडता तो भाड्याने दिला असेल अशा लोकांची नावे आणून द्या म्हणजे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. कारण हा अतिशय गंभीर प्रश्न आहे.

चर्चेच्या ओघाओघात मा.सदस्य श्री.दगडू सकपाळ यांनी मा.खासदार मोहन रावले यांचे पत्र सभागृहाच्या माहितीसाठी वाचून दाखविले. पत्रात पुनर्रचित इमारतीतील गच्चांना कठडा नसल्यामुळे रहिवाशी/~~मुलांना~~ पडण्याचा धोका संभवतो म्हणून अशा इमारतींच्या गच्चींना सिमेंट काँक्रिटचा कठडा बांधून देण्यात यावा. तसेच यापुढील पुनर्रचित इमारतींना कठडे बांधावेत अशी विनंती केली. मा.सदस्य श्री.दगडू सकपाळ यांनी मांडलेल्या वरील बाबीं बाबत सर्व सदस्यांसह, मुख्य अधिकारी यांनीही सहमती दर्शवून मागणी मंजूर करण्यात येत असल्याबाबत जाहिर केले. यावर मा.सदस्य श्री.दगडू सकपाळ, यांनी मुख्य अधिकारी यांचे अभिनंदन केले.

मा.सदस्य श्री.दगडू सकपाळ यांनी परळ व्हिलेज मधील भक्ति व अभंग इमारतीतील काही गाळे संक्रमण शिबीर म्हणून बांधलेले असून त्यापैकी काही गाळे रिक्त आहेत. तरी इमारतींच्या रहिवाशांचे असे म्हणणे आहे की, जर त्यांनी सोसायटी केली तर मंडळ त्यांना इमारत विकत देऊ शकेल का? यावर मा. सभापती यांनी रहिवाशांनी सदर प्रस्ताव मुख्य अधिकारी/ दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांना पाठवून देण्यात यावा, म्हणजे नियमानुसार प्रकरण तपासून योग्य ती कार्यवाही करता येईल किंवा कसे ते पहाता येईल असे सुचविले.

मा.सदस्य श्री.देवदास बाटम यांनी दरसूचीच्या शेवटच्या पानावर कॉन्ट्रॅक्टरर्स असोसिएशन यांच्या सौजन्याने प्रिंटिंग केलेले आहे असे जे लिहिलेले आहे त्यावर आक्षेप घेऊन आपली सरकारी यंत्रणा असतांना छपाई कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन कडून का करुन घेण्यात आली असा सवाल केला? तसेच त्यांनी असेही निदर्शनास आणले की, या भवनातील एक रुम ठेकेदाराला ~~त्यांना~~ देण्यात आली आहे. आणि आम्ही सदस्य असूनही आम्हाला भवनात बसावयास जागा देण्यात आलेली नाही हे बरोबर नाही असा आक्षेप घेतला.

यावर मुख्य अधिका-यांनी असे निदर्शनास आणून दिले की, भवनातील ठेकेदारांना देण्यात आलेली रुम ही प्राधिकरणाने दिलेली आहे. ठेकेदारांना काढण्यासाठी प्रयत्न झाले होते. परंतु त्यांनी न्यायालयाची स्थगिती आणली आहे. यावर मा.सभापती यांनी सर्व सदस्यांना असे आश्वासन दिले की, प्राधिकरणाच्या १२ तारखेला होणा-या बैठकीत ते व मुख्य अधिकारी हा विषय मांडतील व सदस्यांना बसण्यासाठी रुम देण्याबाबतची आपली विनंती त्यांना कळविण्यात येईल

मा.सदस्य श्री.दगडू सकपाळ यांनी असे निदर्शनास आणून दिले की माझगांव विभागात गॅस कंपनी लेन मध्ये म्हाडाचा प्लॉट असल्याचे सांगून त्याठिकाणी जर संक्रमण शिबीर बांधण्यात आले तर कामगार भागातील ब-याचशा नागरीकांची चांगली सोय होईल. तसेच लालबाग व परळ विभागातील काही इमारती अशा आहेत की, त्यांची पुनर्बांधणी शक्य होणार नाही. अशा रहिवाशांना त्या संक्रमण शिबीरात जागा देता येतील. यावर मा. सभापती यांनी भेट देण्याचे ठरवून पुढील योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

मा.सदस्य श्री.अभय सावरकर यांनी असे निदर्शनास आणले की, दुरुस्तीच्या कामाच्या स्थिती संबंधात जो अहवाल दिला आहे त्यात काही ठिकाणी ४० टक्के काम झाले आहे असे दाखवून शेरा " प्रकरण न्यायप्रविष्ट आहे असा दिला आहे. त्याची कारणे काय असू शकतात ?

या प्रश्नावर मा.सभापती यांनी अधिका-यांना सांगितले की, या बाबतचे अहवाल त्यांच्याकडे पाठवून देण्यात यावे म्हणजे ते संबंधितांना पाठवतील.

मा.सदस्य श्री.प्रकाश भुवड यांनी कुलाबा विभागातील इमारती हेरीटेज मध्ये येत असल्यामुळे त्याच्या दुरुस्तीसाठी हेरीटेज कमीटीच्या परवानगीसाठी जावे लागते तरी याबाबत ठोस उपाय योजने गरजेचे आहे. यावर मा. सभापती यांनी सांगितले की, काहीही कारण नसतांनासुध्दा त्यांचे एन. ओ.सी.आपल्या दुरुस्तीसाठी घ्यावे लागते हे बरोबर नाही. तरी याबाबत ते स्वत: जातीने लक्ष घालणार असल्याचे सांगितले.

मा.सदस्य श्री.उसपकर यांनी पुनर्रचित इमारतींच्या देखभाल विभागच्या अधिका-यांबाबत तक्रार करुन त्यांनी असे सांगितले की, राम-लक्ष्मण इमारतीबाबत संबंधितांना वारंवार तक्रार देऊनही लक्ष दिलेले नाही. फोन केला असता.

ते जागेवर नसतात. यावर मा.सभापती यांनी सहमती दर्शवून मुख्य अधिकारी/ दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ एक परिपत्रक काढून सर्व अधिका-यांनी अभ्यंगतांना भेटण्यासाठी योग्य वेळ दिलाच पाहिजे अशा सूचना दिल्या. त्यास मुख्य अधिकारी/दुरुस्ती व पुनर्रचना यांनी सहमती दर्शविली व सर्व अधिकाऱ्यांना त्वरीत कार्यवाही करण्याबाबतचे आदेश दिले.

मा.सदस्य उसपकर यांनी ३६-बी, मुगभाट क्रॉस लेन, व ३६ जीएच मुगभाट ही इमारत दीडवर्षापूर्वी बांधून होऊनही त्या इमारतीत एकही व्यक्ती रहात नाही. त्या इमारतीतील गाळ्यांची टाळी तोडून टाकण्यात आली आहेत. यावर मा.सभापती यांनी ही गंभीर बाब असून तपासणी करणे गरजेचे आहे असे सांगितले.

मा.सदस्य श्री.उसपकर यांनी व्हेकेशन नोटीसवर जुन्या खोलीचे क्षेत्रफळ लिहिलेले नसते. त्यामुळे वितरणाच्या वेळी भांडणे होण्याची परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे कोठेतरी हा नमुना बदला पाहिजे, अशी त्यांनी मागणी केली. तसेच व्हेकेशन नोटीस ही अतिशय महत्वाची असून ती जपून ठेवण्यात यावी अशा सूचना लिहून ठेवाव्यात व त्याही मराठी भाषेत अशीही त्यांनी मागणी केली. या मताशी सर्वांनी सहमती दर्शविली. तसेच त्यांनी पुढे अशी तक्रार केली की, इस्टेट डिपार्टमेंट बद्दल पुष्कळ तक्रारी असून अधिकारी वर्ग जागेवर मिळत नाही तरी यात सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता आहे. यावर मा. सभापती यांनी प्रशासनाने याची गंभीर दखल घेतलेली आहे असे निदर्शनास आणून दिले.

मा.सदस्य श्री.विश्वासराव यांनी मास्टर लीस्ट ही ज्या इमारती होणार नाहीत त्यांची बनविलेली आहे. परंतु त्यात एवढा गोंधळ आहे की, ब-याचशा इमारतींची नांवेच नाहीत. मंडळ ६९ साली निर्माण झाल्यामुळे १९७० सालापासूनच्या इमारतींची यादी आपल्याकडे असणे आवश्यक आहे असे सांगून आपण ५-५ वर्षाचा कालावधी धरून जरी आपण काम केले तरी मास्टर लीस्ट चांगल्याप्रकारे बनू शकेल.

यावर मा.सभापतीं यानी असे निदर्शनास आणले की, तसा प्रयत्न पूर्वी केल्यामुळे मास्टर लीस्ट क्र.१,२,३,४ कराव्या लागल्या. तरी आता जी पध्दत अवलंबीण्यात आली आहे ती योग्य आहे त्यात ज्यांची नांवे नाहीत त्यांची पात्रता तपासण्यात येऊन यादीत नांवे समाविष्ठ करुन ती यादी जाहीर करुन क्रमवार वितरण करण्यात येणार आहे.

६५.

मा.सदस्य श्री.विश्वासराव यांनी ज्या इमारती १९७० साली पडल्या आहेत पण अजून पुनर्रचित झालेल्या नाहीत त्या इमारतींची यादी आम्हाला देण्यात यावी अशी मागणी केली. यावर मा.सभापतींनी संबंधित उपस्थित अधिका-यांना सूचना दिल्या की, त्यांनी अशा इमारतींची यादी त्यांना सादर करावी म्हणजे ते ती सर्व सन्माननीय सदस्यांना देतील.

मा.सदस्य श्री.गणेश तिकोने यांनी असे निदर्शनास आणून दिले की, त्याच्या माहिती मधील के.के.मोदी चाळीच्या ९० % रहिवाशांनी मालका-बरोबर त्यांची इमारत पूर्ण विकसीत करण्याचे ठरविले आहे. परंतु काही लोक सदर इमारतीस दुरुस्ती करण्यास अडळास भाग पाडत आहे तरी याबाबत काय कार्यवाही करता येईल यावर खुलासा करतांना मा.सभापतींनी स्पष्ट केले की, सदर इमारतीमधील भाडेकरु मला येवून भेटले. सदर इमारतीमध्ये दोन गट असून एक गट दुरुस्तीसाठी तगादा लावतो. दुसरा गट "ना हरकत प्रमाण पत्रा"साठी विचारणा करतो तरी याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधींना त्यांनी कळविले असून योग्य तोडगा निघाल्यावर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

मा.सदस्य श्री.दगडू सकपाळ यांनी सुर्यदर्शन या इमारतींच्या रस्त्याचे काम खोळंबले आहे तरी त्या काय अडचण आहे ? यावर मा.सभापतींनी श्री.हुले यांना याबाबत सन्माननीय सदस्यांनी माहिती बैठक संपल्यावर देण्यास सांगितले.

सभेच्या अखेरीस मा.सभापतीनी सर्व सन्माननीय सदस्यांचे व उपस्थित अधिका-यांचे, प्रतिनिधींचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहिर करून पुढील बैठक आगाऊ कळविण्यात येईल असे प्रतिपादन केले.

नि.का.अ./इ.प.

मा.सभापती/इ.प.

मुख्य अधिकारी/इ.प.